पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील संपादित केलेल्या जमिनींसाठी १२.५% प्रमाणित जमिन मालकास मंजूर करण्याबाबत
जमिन हस्तांतरित करण्याबाबतची ५वर्षाची प्रतिबंधित कालावधीची अट शिथिल करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:पीसीएन १९९९/७३/१२२/९९/नवि-२२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: ८ ऑगस्ट, २०००.

वाचा- १) शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांक:पीसीएन १९८९/२२८/ प्र.क्र. ३१/नवि-२२, दि. ३ मार्च, ९०

२) शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांक:पीसीएम १९८९/२२८/प्र.क्र. ३१/ नवि-२२, दि. १५ सप्टेंबर, ९३

प्रस्तावना -पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणासाठी संपादित करावयाच्या जमिनी शक्य तेवढ्या लवकर प्राधिकरणाच्या ताब्यात येण्याच्या दृष्टीने व प्राधिकरणाच्या कामास चालना मिळण्याच्या दृष्टीने तसेच भूसंपादनाच्या नियमानुसार भूधारकांना देण्याची नुकसान भरपाई दिल्यानंतर ज्यांच्या जमिनी संपादित केल्या जाणार आहेत त्या नागरिकांना त्या भागातच स्थायिक होऊन नागरिकरणामध्ये सहभाग घेता यावा, या दृष्टीने शासनाने अशा भूधारकांना १२.५% जमिन मंजूर करण्याचा निर्णय दि. ३ मार्च, ९० च्या शासन निर्णयान्वये घेतला होता. उक्त निर्णयानुसार पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणास संबंधित खातेदारांनी तसा विकल्प दिल्यास प्राधिकरणाने ८७.५% एवढ्या संपादित जमिनीची विहीत नुकसान भरपाई दिल्यानंतर व खातेदारांनी संपादित करावयाची संपूर्ण जमिन प्राधिकरणाच्या ताब्यात प्रत्यक्षात दिल्यानंतर १२.५% जमिन प्राधिकरणाने खातेदारास देण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यानंतर दि. ३ मार्च, ९० रोजीच्या शासन निर्णयामध्ये अंशत: फेरबदल करून सुधारित आदेश दि. १५ सप्टेंबर, ९३ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत. उक्त शासन निर्णयातील अट क्र. "फ" नुसार प्राधिकरणाने



पृ.मा.प.

जमिन मालकांना परत केलेली जमिन दुसऱ्या व्यक्तिस प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीने कोणत्याही प्रकारची रक्कम प्राधिकरणास न देता हस्तांतरित करता येईल. परंतु अशा दुसऱ्या व्यक्तीस ती जमिन त्यापुढे प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीशिवाय व नियमानुसार अनर्जित रक्कमेचा विहीत भाग प्राधिकरणास दिल्याशिवाय हस्तांतरीत करता येणार नाही, अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

प्राधिकरणाच्या भूवाटप नियम, १९७३ मधील नियम क्रमांक: १०[८] नुसार भूखंड धारकास भाडेपट्ट्याच्या दिनांकापासून किमान ५ वर्षापर्यन्त भूखंडाचे हस्तांतरण दुसऱ्या व्यक्तीच्या नावे करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. सदर अट १२.५% जमिन वाटप करण्यात आलेल्या लाभार्थीच्या प्रकरणांमध्ये शिथिल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> – पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीसंदर्भात मंजूर करण्यात आलेल्या १२.५% जमिनीच्या प्रकरणी डिस्पोझल ऑफ लँड रेग्युलेशन १९७३ मधील नियम क्रमांक: १०(८) नुसार भूखंडधारकास भाडेपट्ट्याच्या दिनांकापासून किमान ५ वर्षापर्यन्त भूखंडाचे हस्तांतरण दुसऱ्या व्यक्तीच्या नावे करण्यास प्रतिबंध केल्याची अट शिथिल करण्यात येत आहे. तसेच शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांक: पीसीएन १९८९/२२८/ प्र.क्र. ३१/नवि-२२, दिनांक १५ सप्टेंबर, ९३ मधील "फ" ही अट रद्द करण्यात येत असून अशा जमिनीचे प्रथम हस्तांतरण करताना विकसनशील क्षेत्रासाठी रु. २२५/- प्रति चौरस मीटर व अविकसित क्षेत्रासाठी रु. १५० प्र. चौ. मी. इतके हस्तांतरण शुल्क आकारण्यास शासन मंजूरी देत आहे. तसेच दुसऱ्या व्यक्तीस ती जमीन त्यापुढे प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय व नियमानुसार अनर्जित रक्कमेचा विहीत भाग प्राधिकरणास दिल्याशिवाय हस्तांतरीत करता येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ बी. आर. कदम ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति-
मुख्य कार्यकारीअधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
कार्यासन नवि-२२. [निवड नस्ती]


Source: Government of Maharashtra Official Website